-----------------------------------------------

-----------------------------------------------

## मृत्युपत्राविषयी वारंवार विचारले जाणारे प्रश्ण

-----------------------------------------------

---------------------------------------------

प्र. १ मृत्युपत्र म्हणजे काय?

उत्तर:-मृत्युपत्र हे एक, दोन साक्षिदारांच्या समक्ष प्रस्तावित केलेले लिखित घोषणापत्र असते ज्यात व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या ज्या काही इच्छा असतील त्याची, त्या व्यक्तीच्या मालमत्तेची संपत्तीची परिवारात , नातेवाईकात , बाहेरील लोकांमध्ये व दान देणे इत्यादीत कशी वाटणी करण्यात यावी ह्याची माहिती दिलेली असते.

प्र.२ मृत्युपत्र बनविण्याचे काय फायदे असतात?

उत्तर:-मृत्युपत्र बनविल्याने व्यक्तीला त्याच्या मृत्यूनंतर त्याची मालमत्ता व संपत्ती ह्याची वाटणी व विल्हेवाट त्याच्या इच्छेनुसार परिवारात कोणत्याही प्रकारचे वाद व तंटे न होता झाली आहे हे सुनिश्चित करता येते. जर तुम्हाला तुमच्या एखाद्या नातलगाला/वारसाला तुमच्या मालमत्तेचा व संपत्तीचा ज्यास्त वाटा देण्याची इच्छा असेल व एखाद्या व्यक्तीला काहीच देण्याची इच्छा नसेल तर मृत्युपत्र हा एकच परिणामकारक दस्तवेज आहे की ज्यामुळे हे सुनिश्चित करता येते.उदाहरणार्थ- स्वतःचे अवयव दान करण्याची इच्छा, पत्नीला फ्लॅट देण्याची इच्छा, एका विशिष्ट मुलाला/मुलीला ज्यास्त/कमी देण्याची इच्छा, काही रक्कम पालकांना, भागिदाराला सांभाळ करण्याऱ्या व्यक्तीला किवा मित्राला

देण्याची इच्छा ह्या सर्व इच्छांचा ह्यात समावेश असतो. परिवारातील सर्व सदस्यांना, नातलगांना, सर्व कायद्यांना व भारताच्या सर्वोच्च्य न्यायालयासमवेत सर्व न्यायालयांसाठी मृत्युपत्र बंधनकारक असते.

प्र. ३ जर मी मृत्युपत्र केले नाही तर काय होईल?

उत्तर:- जेव्हा एखादी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत्यू पावते, (ज्याला कायद्याच्या भाषेत 'इन्टेस्टेट' म्हणतात) मृत व्यक्तीच्या सर्व संपत्तीची, मालमत्तेची वाटणी त्याला लागू असलेल्या वारसा कायद्यानुसार केली जातेजसे हिंदू वारसा अधिनियम, प्रत्येकाला हे माहीत असावे की वारसा कायद्यामध्ये मालमत्तेची वाटणी सर्वांना/ बऱ्याच परिवार सदस्यांमध्ये एक निर्धारित प्रमाणात केली जाते जे मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या इच्छेच्या विपरीतही असू शकते. अश्या वेळी मालमत्तेच्या वाटपात विलंबही होवू शकतो आणि बऱ्याचदा कायद्याच्या केसेस, आई व मुलामधील तंटे, भावाभावांमधील भांडणे, भावंडांमधील भांडणे इत्यादी असू शकतात.

प्र.४ कोण मृत्युपत्र बनवू शकतो?

उत्तर:- कोणतीही व्यक्ती जी १८ वर्षांवरील वयाची आहे व जी मानसिक रित्या स्वस्थ आहे व जिला स्वतः काय करीत आहे ह्याचे ज्ञान आहे आणि जी कोणत्याही अयोग्य परिणामांपासून दूर आहे, ती व्यक्ती मृत्युपत्र बनवू शकते.

प्र. ५ व्यक्तीने वृद्ध होण्याची वाट न पाहता कोणत्याही वयात का मृत्युपत्र बनवावे ?

उत्तर:- होय, १८ वर्षांचे झाल्यावर कोणत्याही वेळी व्यक्तीने मृत्युपत्र बनवावे कारण सद्याचे जग अनिश्चिततेने भरलेले आहे ज्यांत अपघातांमुळे अवेळी मृत्यू , हृदयरोग, दहशतवादी हल्ले हे सर्व जीवनाचा एक भागच बनलेला आहे आणि त्यामुळेच बरेच लोक २५ व्या वर्षीच विमा घेतात. जर व्यक्ती अवेळी मृत्यू झाल्यास परिवाराला आर्थिक आधार देण्यासाठी जवानीतच विमा घेते तर मग त्या व्यक्तीने १८ वर्षाच्या वयानंतर मृत्युपत्र; जी एक लेखी सूचना विम्याचा क्लेमचा ,अन्य संपत्तीचा वाटप कसा व्हावा ह्याबद्दल माहिती देते, ते प्रत्येक व्यक्तीने जरूर करावे.

प्र.६ मृत्युपत्र कसे करावे ?

उत्तर:-मृत्युपत्र हाती लिहिलेलेही असू शकते अथवा टाइप केलेलेही असू शकते, पण टाइप केलेले मृत्युपत्र ज्यास्त पसंद केले जाते.ह्याला कोणत्याही स्टँप पेपरची गरज नसते , हे कोऱ्या कागदावरही केले जावू शकते. जी भाषा मृत्युपत्रकर्त्याला समजते अश्या कोणत्याही भाषेत मृत्युपत्र केले जावू शकते. मृत्युपत्रात कमीत कमी तुमच्या परिवाराबद्दलचा तपशील, तुमच्या संपत्तीचा, मालमत्तेविषयीचा तुमच्या देण्याचा , तुमच्या इच्छांचा, तुमच्या संपत्तीच्या वाटपा विषयीचा , दोन साक्षिदारांचा, सही कर्त्याच्या तारखेचा , जागेचा तपशील असावा व मृत्युपत्र करणाऱ्याची व साक्षिदारांची सही प्रत्येक पानावर असावी.

प्र. ७ मी मौखिक मृत्युपत्र केव्हा बनवू शकतो ?

उत्तर:-नाही. हे एक विशिष्ट मृत्युपत्र म्हणविले जाते व ते करण्यास फक्त सेनेतील शिपाईगण, हवाईदलातील कर्मचारीगण, नौदलातील कर्मचारीगण ह्यानाच परवानगी दिली जाते. काही मुस्लिम व्यक्तींना त्यांचा वैयक्तिक कायद्यांनुसार असे मौखिक मृत्युपत्र करण्याची परवानगी दिली जाते.

प्र.८वेगवेगळ्या धर्मांसाठी काय कायदेही वेगवेगळे आहेत?

उत्तर:- होय. ह्याचा संमंध वारसा कायद्यांशी आहे जेथे मृत्यू पावलेल्या व्यक्तीला ज्या धर्माचे कायदे लागू असतील तेचे कयदे लागू होतील. उदाहरणार्थ- हिंदूसाठी हिंदू वारसा कायदे, आणि पारशी व ख्रिश्चन लोकांसाठी भारतीय वारसा अधिनियम लागू राहील व मुस्लिमांसाठी शेरियते कायदे लागू राहतील. ( शिया, सुन्नी व खोजांसाठी भिन्न नियम आहेत)

प्र.९ मृत्युपत्राच्या साक्षिदारांसाठी कोणते नियम लागू आहेत?

उत्तर:- कायद्यानुसार मृत्युपत्रावर दोन साक्षिदारांच्या समक्ष सही झाली पाहिजे. ह्या साक्षिदारांना मृत्युपत्रातील मजकूराबद्दलची माहिती असणे गरजेचे नाही. त्यांनी फक्त हे सुनिश्चित करावयाचे असते की मृत्युपत्रावर त्यांच्या समक्ष सही झाली आहे. कायद्यानुसार मृत्युपत्रा संबंधीत काही कायद्या विषयी/ सत्ययेविषयी समस्या निर्माण झाली तर साक्षिदारांना कोर्टाकडून बोलाविले जावू शकते. हल्लीच्या दिवसात ह्या मृत्युपत्र सहीच्या प्रणालीचे व्हिडियो रेकॉर्डिंग करण्याचा सल्ल दिला जातो व ह्याची क्लिप मूळ मृत्युपत्राबरोबर सुरक्षितपणे ठेविली जाते व ह्यामुळे मृत्युपत्राचा कायदेशीरपणा प्रमाणित

करण्याची जर वेळ आली तर तर ह्याचा   एक कायदेशीर पुरावा म्हणून उपयोग केला जावू शकतो.

प्र.१० एक्सेक्युटर म्हणजे काय?मृत्युपत्रासाठी एक्सेक्युटर नेमणे जरूरी आहे काय?

उत्तर: एक्सेक्युटर ही अशी एक व्यक्ती मृत्युपत्रकर्त्याने नेमलेली असते जिला तो मृत्युपत्रात नमूद केलेल्या इच्छांनुसार कार्यवाही करण्यास अधिकृत करतो. एक्सेक्युटर मृत्युपत्रापासून फायदा मिळणारा कोणतीही व्यक्ती अथवा कोणतीही विश्वासार्ह व्यक्ती म्हणजे पारिवारिक मित्र, अथवा वकील अथवा सी.ए. जो परिवाराला मृत्युपत्रातील इच्छांनुसार कार्यवाही करण्यास मदत करू शकतो अशी व्यक्ती असू शकते.एक्सेक्युटर नेमणे आवश्यक नसते पण तो नेमणे केव्हाही पसंत केले जाते.

प्र. ११ मृत्युपत्राला नोटराइज्ड अथवा रजिस्टर करणे आवश्यक आहे का? त्यापासून काय फायदे होतात?

उत्तर:- नाही मृत्युपत्र नोटराइज्ड अथवा रजिस्टर करणे आवश्यक नाही. तरीही एक्सेक्युट झाल्यावर केव्हाही मृत्युपत्र नोटराइज अथवा रजिस्टर केले जावू शकते व त्यासाठी सब रजिस्ट्रार कार्यालय स्कॅनिंग चार्जेस व्यतिरिक्त कोणतेही शुल्क घेत नाही. मृत्युपत्र रेजिस्टर केले गेले आहे म्हणजे मृत्युपत्रकर्ता स्वतः दोन साक्षिदारांना घेवून रेजिस्ट्रेशन कार्यालयात गेला आहे व त्याने सब रजिस्ट्रारच्या (सरकारी अधिकारी)   समक्ष मृत्युपत्र बनविले आहे. हे केल्याने परिवारातील सद्स्यातील/नातलगातील मृत्युपत्राच्या सत्यतेविषयीच्या   संभावित समस्या निर्माण   होणार नाहीत. मृत्युपत्र रजिस्टर करण्यासाठी मृत्युपत्रकर्त्याला स्वतः दोन साक्षिदारासमवेत ( हे साक्षिदार सही

करण्याच्या वेळी असलेले सक्षिदारच असणे जरूरी नाही) मूळ मृत्युपत्र  व एम. बी. बी.एस. डॉक्टर कडून मिळालेले मानसिक फिटनेस विषयीचे प्रमाणपत्र व ॲड्रेसचे प्रूफ घेवून कार्यालयात जावे लागेल.

प्र.१२ मृत्युपत्रात कोणकोणत्या संपतीचा/मालमत्तेचा उल्लेख केला जावू शकतो ?

उत्तर:- सर्व स्थावर, जंगम,  दिसणारी व अदृष्य मालमत्ता , सिंगल व संयुक्त नावाने असलेली सर्व मालमत्ता, संपत्ती, येणे असणारी रक्कम, देणे असणारी रक्कम ह्या सर्व बाबींचा उल्लेख मृत्युपत्रात असणे इष्ट आहे. जंगम मालमत्तेत नगदी रक्कम, दागिने, एफ.डीज, बँकेतील खाती, विम्याच्या पॉलिसिज वाहने, आपले सर्व फर्निचर व फिक्सचर,ह्यांचा समावेश असावा व स्थावर मालमत्तेत तुमच्या मालकीच्या जमिनीचा, इमारतींचा, फ्लॅट्सचा, ऑफिसेसचा, प्लॉटसचा, व गॅरेज इत्यादींचा समावेश असावा.

प्र. १३ संयुक्त मालमत्तेचा समावेश मृत्युपत्रात केला जावू शकतो का?

उत्तर:- होय. मृत्युपत्रकर्त्याच्या इच्छेनुसार संयुक्त मालमत्तेत असलेल्या त्याच्या हिश्श्यानुसार त्याला त्याच्या इच्छा मृत्युपत्रात उल्लेख करण्याची परवानगी आहे. सर्व संयुक्त मालमत्तांचा  उल्लेख फालतू तंटे टाळण्यासाठी करणे गरजेचे आहे.

प्र. १४ ज्या संपत्तीचे /मालमत्तेचे नामांकन फाईल केलेले आहे अश्यांचा समवेशही केला जावू शकतो का?

उत्तर:- होय. कायद्यानुसार नॉमिनेशन म्हणजे फक्त एक सुविधा आहे कि

ज्यामुळे मालकाच्या मृत्यूनंतर नॉमिनीला मालमत्तेवर क्लेम दाखविता येतो आणि नॉमिनी काही मर्यादित काळापर्यंत , मृत्युपत्रानुसार अथवा सक्सेशन अधिनियमानुसार कायदेशीर वारस जाहीर होईपर्यंत एका ट्रस्टीचे काम करू शकतो आणि त्यामुळे नॉमिनीला कायदेशीर वारसाला मालमत्ता द्यावीच लागेल. नॉमिनीला कायदेशीर वारस म्हटल तरी चालेल. पण त्यातही अपवाद असू शकतात आणि म्हणूनच ह्या सर्वांचा शक्य असेल तर स्पष्ट उल्लेख केलेला असावा.

प्र. १५ भाड्याने दिलेल्या मालमत्ता/टेनंसी अधिकार ह्यांचा समावेश मृत्युपत्रात करता येतो का?

उत्तर:- नाही. टेनंसी अधिकार म्हणजे मालमत्ता/संपत्ती नव्हे आणि त्यामुळे त्यांचा समावेश मृत्युपत्रात केला जाणीर नाही.

प्र. १६ लीझहोल्ड अधिकारांचा समावेश मृत्युपत्रात होऊ शकतो का?

उत्तर:- होय. लीझहोल्ड अधिकारांचा समावेश मृत्युपत्रात होऊ शकतो.

प्र. १७ वडिलोपार्जित मालमत्तेचा अथवा भूतकाळात कायदेशीर वारस ह्या नात्याने मिळालेल्या मालमत्तेचा समावेश मृत्युपत्रात होवू शकतो का?

उत्तर: वडिलोपार्जित मालमत्त ज्यात टायटल/ मालकी कायदेशीररित्या ट्रान्सफर झाली आहे अश्या मालमत्तेचा समावेश मृत्युपत्रात होऊ शकतो.

प्र. १८ फर्म अथवा कंपनीतील धंद्यातील मालकी हक्काचा समावेश मृत्युपत्रात

होऊ शकतो का?

उत्तर:- होय. प्रोपरायटरशिप फर्म मधील प्रोपरायटर म्हणून असलेली मालकी व कंपनीतील भागिदार म्हणून असलेली मालकी  ह्यांचा मृत्युपत्रात समावेश होवू शकतो पण ह्या वेळी जर का पार्टनरशिप डीडमध्ये काही शर्ती असतील त्या विचारात घेतल्या पाहिजेत.

प्र. १९ एच. यु. एफ. मधील भागिदारीचा उल्लेख मृत्युपत्रात होवू शकतो का?

उत्तर:- नाही. हिंदू अविभाजित परिवारातील हिश्शाचा उल्लेख मृत्युपत्रात केला जावू शकणार नाही.

प्र. २० आणखी कोणकोणत्या मालमत्तेचा व संपत्तीचा उल्लेख मृत्युपत्रात करता ये ईल?

उत्तर:- पाळीव प्राण्यांचा, पेंटिंग्जचा, ॲन्टिक्सचा , इलेक्ट्रॅानिक वस्तूंचा, फर्निचरचा, व बौद्धिक संपत्ती जशी ट्रेडमार्क, पेटन्ट्स, कॅापिराइट्स, लायसेन्सेस, सोशल मिडिया खाती, वैयक्तिक गोष्टी, पुस्तके ह्यांचा समावेश मृत्युपत्रात होवू शकतो.

प्र.२१ नाबालिग मुलांचे कसे रक्षण करावे?

उत्तर:- लहान मुले जी मृत्युपत्रातील उपभोगता आहेत त्यांच्यासाठी तुम्ही पालकांचे नामांकन करू शकता आणि लहान मुलांच्या हिश्श्याची राखण करण्याची जबाबदारी ह्या पालकांवर राहील. बऱ्याच वेळा लोक मृत्युपत्राद्वारे कायदेशीर वारसांच्या मित्रांच्या, नातलगांच्या फायद्यासाठी व देणगी देण्यासाठी

एक ट्रस्ट बनवितात .

प्र. २२ जी मालमत्ता/संपत्ती मृत्युपत्रात समाविष्ट करण्याचे विसरण्यात गेले /राहून गेले  अथवा जी नंतर घेतली गेली त्याचे काय?

उत्तर:- मृत्युपत्रात एक सर्वसाधारण क्लॉज उरलेल्या संपत्तीसाठी/ मालमत्तेसाठी (इतर मालमत्ता/संपत्ती जी विसर्ण्यात गेली आहे)  समाविष्ट केलेला असतो ज्यात उरलेल्या संपत्तीचा व भविष्यात घेतलेल्या संपत्तीचा समावेश केलेला असतो.

प्र २३. भविष्य काळात मृत्युपत्रात बदल म्हणजेच जोडणी व घट होवू शकते का? नवीन मृत्युपत्र बनू शकते काय?

उत्तर:- एक व्यक्ती पाहिजे तेवढ्या वेळा नवे मृत्युपत्र बनवू शकते अथवा ती व्यक्ती कोडिसिल करून काही बदल करू शकते जे ंमृत्युपत्राची पुरवणी असते.पण येथे ह्याचा उल्लेख झालाच पाहिजे की हे अंतिम मृत्युपत्र आहे आणि ह्या आधी जर का मृत्युपत्र बनले असेल तर ते निरस्त मानण्यात यावे आणि फक्त अंतिम मृत्युपत्रालाच कायदेशीर मानण्यात ये ईल.

प्र. २४  मृत्युपत्र कोठे सुरक्षितपणे ठेवावे?

उत्तर:- कायद्याप्रमाणे मृत्युपत्र कुठेही ठेवता ये ईल. पण तुमचे मृत्युपत्र एखद्या सुरक्षित जागीच ठेविणे इष्ट होईल जिथे त्याला कुणीही हात लावू शकणार नाही व जे तुमच्या मृत्युनंतर तुमचे परिवारजन सहजपणे शोधू शकतील. ते लॉकरच्या सेफ  कस्टडीमध्ये ठेवता ये ईल अथवा एखाद्या विश्वासाआर्ह व्यक्तीजवळ अथवा बँकर अथवा सॉलिसिटर कडे ठेवता ये ईल जो तुमच्या

मृत्यूनंतर तुमच्या एक्सेक्युटरला लगेच कळवेल. अनेक बँका व आर्थिक संस्था तुमची मृत्युपत्रे सुरक्षित ठेविण्यासाठी त्यात्या कस्टोडियन सेवा अर्पित करीत असतात.

प्र. २५ परदेशातील मालमत्तांचा उल्लेख मृत्युपत्रात करता येतो का?

उत्तर:- होय. परदेशात  अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर तेथील स्थानीय नियमांचे नियम लागू असतात आणि त्यावर मृत्युपत्र अमलात आणण्याची प्रणाली भारतातील प्रणालीपेक्षा वेगळी असू शकते. म्हणून दोन वेगळी मृत्युपत्रे बनविणेच इष्ट असते ; एक भारतातील मालमत्तेसाठी व दुसरे परदेशातील मालमत्तेसाठी.  अश्या मृत्युपत्रांना 'कॅानकरन्ट' मृत्युपत्रे म्हणतात आणि त्यांना जर ती एकमेकात लिंक झालेली नसतील तर स्वतंत्रपणे ट्रीट केले जाते .

प्र. २६ नवरा-बायको एकत्रितपणे एकच जॉइन्ट मृत्युपत्र बनवू शकतात काय?

उत्तर:- होय. ह्या  ठिकाणी दोघांनीही एकमेकांच्या नावाने सर्व मालमत्ता लिहून दिलेली असते आणि शेवटी ती परिवाराला व नातगांना जॉइन्ट मृत्युपत्राद्धारे लिहून दिली असते. पण हे जॉइन्ट मृत्युपत्र जेव्हा दोघांचाही मृत्यू होईल तेव्हाच लागू होईल , एक जिवंत असताना लागू होणार नाही. बऱ्याच वेळा नवरा व बायको एक 'मिरर' मृत्युपत्र बनवितात जे एक स्वतंत्र व्यक्तिगत मृत्युपत्र असते व ज्यात तिची/त्याची मालमत्ता एक दुसऱ्यास देतात.

प्र. २७ मृत्युपत्रात उपभोगता कोण होवू शकेल?

उत्तर:- उपभोगता जी व्यक्ती असते जिला मृत्युपत्राप्रमाणे मालमत्ता दिली जाते, म्हणजेच जिला मृत्युपत्रापासून फायदा होतो. कोणतीही व्यक्ती, बॉडी,

चॅरिटेबल संस्था, सोसायटी मृत्युपत्रात उपभोगता होवू शकतो. मृत्युपत्राप्रमाणे तुमचा परिवारजन, नातलग, मित्र, नोकर इत्यादी उपभोगता बनू शकतात . तुम्ही तुमची मालमत्ता दानही करू शकता. परंतु जर तुम्हाला जवळचे नातेवाईक असतील आणि तरीही तुम्ही आपली सर्व मालमत्ता दान करू इच्छिता तर कायद्याने काही विशिष्ट प्रणाली सेट केली आहे. हे बंधन पॅरिस मध्ये नाही, तेथे तुम्ही आपली सर्व मालमत्ता दान करू शकता.

प्र. २८. माझे कायदेशीर वारस कोणास म्हणता ये ईल?

उत्तर:- वारसाच्या वैयक्तिक कायद्यानुसार जी व्यक्ती; पुरूष अथवा स्त्री, जिला मृत व्यक्तीच्या मालमत्तेचा ताबा मिळू शकेल तिला कायदेशीर वारस म्हणतात. हिंदू वारसा अधिनियमानुसार जर का मृत्युपत्र केलेले नसेल तर मालमत्तेचे वाटप समान प्रमाणात सर्व क्लास १ वारसांमध्ये होईल. जर क्लास १ वारस अस्तित्वात नसतील तर ते वाटप क्लास २ च्या वारसांमध्ये समप्रमाणात होईल. जर क्लास २ मध्येही कोणी नसेल तर ते सगोत्रात वाटले जाईल आणि तेही नसेल तर सजातियात वाटले जाईल. जर कोणीच उपलब्ध नसेल तर ती मालमत्ता सरकारजमा होईल.

प्र २९. मृत्युपत्र केव्हा व कसे निरस्त करता ये ईल?

उत्तर:- कोणीही केव्हाही मृत्युपत्र निरस्त/मागे घेवू शकते अथवा नवे मृत्युपत्र बनवू शकते. जर एक मृत्युपत्र बनले तर मागील सर्व मृत्युपत्रे निरस्त मानली जातात. खालील प्रकारांनी मृत्युपत्र मागे घेतले जाते.

१. पाठोपाठ येणाऱ्या मृत्युपत्राच्या एक्सेक्युशनमुळे
२. मृत्युपत्र लिखितपणे मागे घेण्याचा उद्देश्य जाहीर करून
३. मृत्युपत्र जाळून, फाडून अथवा कसाही त्याचा नाश करून

प्र. ३० मृत्युपत्रात नमूद केलेल्या मालमत्तेवर मला अथवा माझ्या कायदेशीर वारसांना आयकर व इतर कर द्यावे लागतील काय?

उत्तर:- नाही. वर्तमानात जी मालमत्ता  मृत्युपत्रानुसार प्राप्त झाली आहे त्यावर कॅपिटल टॅक्स सहित अन्य कोणताही टॅक्स द्यावा लागणार नाही. ह्या आधी एस्टेट ड्युटी भरावी लागत असे पण आता ती लागू नाही.

प्र. ३१ मुस्लिमांच्या मृत्युपत्रात कोणत्या विशेष तरतूदी आहेत?

उत्तर:-मुख्यत्वे मुस्लिम मृत्युपत्रा विषयी व वारसाहक्कविषयी  त्यांच्या वैयक्तिक कायद्याच्या अन्तर्गत कायद्यानुसार असतात आणि भारतात फक्त जनरल सक्सेशन ॲक्टच्या अन्तर्गत असतात जो इन्डियन स्क्सेशन ॲक्ट ह्या नावाने ओळखला जातो. एक साधारण नियम म्हणून मुस्लिम आपल्या १/३ मालमतीचेच मृत्युपत्र बनवू शकतो आणि उर्वरित मालमत्तेचे वाटप शरियत ॲक्टच्या नुसार टेस्ट केलेल्या सक्सेशनानुसार होते.

प्र. ३२ ख्रिश्चन्स, पारशी व ज्यु लोकांच्या मृत्युपत्रात कोणत्या विशेष तरतूदी असतात?

उत्तर:-  ख्रिश्चन्स व पारशी लोकांची मृत्युपत्रे विवाहानंतर निरस्त होतात/मागे घेतली जातात. एक पारशी व्यक्ति आपली सर्व मालमत्ता मृत्युपत्रानुसार दान करू शकतो.

प्र ३३. मृत्युपत्राचे प्रोबेट म्हणजे काय ? हे सर्व मृत्युपत्रांसाठी आवश्यक असते

काय?

उत्तर:-प्रोबेट म्हणजे अंतिम  मृत्युपत्राची सत्यता प्रमाणित करण्यासाठी कोर्टाने दिलेले एक प्रमाणपत्र. नामाकित केलेला एक्सेक्युटर प्रोबेट साठी अर्ज करू शकतो. जेव्हा कोर्ट प्रोबेटला स्वीकृती देते आणि मृत्युपत्र प्रमाणित करते, त्यानंतर  एक्सेक्युटर मृत्युपत्राची अंमल बजावणी करण्यासाठी पाऊले उचलू शकतो. नेहमीच प्रोबेट आवश्यक नसते पण जेव्हा अनेक स्थावर मालमत्ता असते आणि हायव्हॅल्यु संपत्ती असते, तेव्हा प्रोबेट भविष्यात होणारे तंटे टळण्यासाठी आवश्यक असते.

प्र. ३४ जर मृत्युपत्र नसेल तर कायदेशीर वारस कसा ठरविण्यात येतो?

उत्तर:- जेव्हा मृत्युपत्र नाही अशी परिस्थिती असत आणि जेव्हा फक्त जंगम मालमत्ता अस्तित्वात असते तेव्हा कोर्टाकडून सक्सेशन सर्टिफिकेट घ्यावे लागते . जर एखाद्या व्यक्तीकडे स्थावर मालमत्त असेल तर अशा  केसेस मध्ये कोर्टाकडून लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन घ्यावे लागेल.

प्र ३५ उपभोगता(बेनिफिशियरी) व नॉमिनीमध्ये काय फरक आहे?

उत्तर:- नॉमिनी हाफक्त मालमत्तेचा ट्रस्टी (विश्वस्त) असतो व त्याला/तिला कायदेशीर वारसाला व उपभोगत्याला जिला  मृत्युपत्रानुसार अधिकार प्राप्त आहे तिला मालमत्त द्यावी लागते.
प्र. ३६ मृत्युपत्राप्रमाणे मालमत्तेचे वाटप केव्हा होते?

उत्तर:- मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यू नंतरच मालमत्तेचे वाटप होते.

प्र ३७. मृत्युपत्र बनविण्याच्या वेळी वकिलाची मदत घेणे जरूरी आहे काय?

उत्तर:- नाही. एक साधे मृत्युपत्र बनविण्यासाठी योग्य ती काळजी घेवून तुम्ही स्वतःच ते बनवू शकता, फक्त तसे करताना योग्य ते शब्द काळजीपूर्वक वापरले गेले पाहिजेत व त्यात कोठलाही अस्पष्टपणा अथवा विरोधाभास असता कामा नये की ज्यामुळे विनाकारण गैरसमज/पारिवारिक  व नातलगात तंटे होण्याचा संभव असतो.